तुरुंगातून सरकार चालवू शकतो का? विरोधकांना जेलमधून पीएम-सीएम हाऊस चालवायचं आहे : अमित शाह >>पान 2

जीव गेला तरी बेहत्तर मात्र ओबीसींचे आरक्षण संपू देणार नाही - लक्ष्मण हाके यांचा इशारा >>पान 3

अखेर त्या नादुरुस्त रस्त्याची दुरुस्ती >>पान 4


**सुविचार**


नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 35 ■ मंगळवार, दि. 26 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


**योगींवर बनवलेल्या चित्रपटाला मुंबई उच्च न्यायालयाने दिली मंजुरी** आतील पान

# मराठ्यांनो सगळी कामे थांबवा, मुंबईकडे कूच करा



अंतरवाली सराटी/प्रतिनिधी : मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी ओबीसीमधून मराठ्यांना आरक्षण मिळण्यासाठी निर्णायक लढ्यासाठी रणशिंग फुंकलं आहे. २९ ऑगस्ट रोजी कोणत्याही परिस्थितीत मुंबईमध्ये आंदोलन करणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. मनोज जरांगे पाटील यांनी (२५ ऑगस्ट) रोजी आंतरवाली सराटीमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये मराठ्यांना सर्व कामधंदे बाजूला ठेवून त्यांनी मुंबईमध्ये येण्याचे आवाहन केलं आहे.

## मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षणासाठी शड्डू ठोकला

ज्या मार्गाने मदत होईल, त्या मार्गाने आंदोलनाला मदत करावी असे आवाहन सुद्धा पाटील यांनी केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमच्या मागणी मान्य केल्यास आम्हाला मुंबईला येण्याची गरज नाही अकायद्यात बसणारे आरक्षण आम्हाला हवं आहे. न बसणाऱ्या २९ जाती फडणवीस यांनी ओबीसी आरक्षणात घालून त्यांनी खुन्नस दाखवली आहे. आजचा दिवस प्रेमानं सांगण्याचा असून आरक्षण दिल्यास मुंबईला जाण्याची आवश्यकता नाही. तुम्ही नाही दिले ते मी सरकार सुद्धा उलथवून टाकू शकतो, असा इशारा सुद्धा जरांगे पाटील यांनी दिला. आंतरवाली सराटीत आल्यावर मी कोणा मंत्र्याचे ऐकणार नाही. चार महिन्यांपूर्वीच आंदोलनासाठी तारीख दिली असल्याचे त्यांनी सांगितलं.

दरम्यान दोन महिन्यांपूर्वी आपण स्वतः फडणवीस यांना फोन केला होता आणि आंतरवाली सराटी देण्याचा आवाहन केलं होतं, असेही जरांगे पाटील म्हणाले.

दरम्यान, मुंबईत आंदोलनाचा निर्धार कायम ठेवत मनोज जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांना कोणत्याही पद्धतीने ट्रॅफिक जाम होऊ नये यासाठी कोणताही एका मार्गाने आझाद मैदानात जाण्यासाठी मार्ग देण्याची विनंती केली. शिंदे समितीचा दाखला देत म्हणून जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्ला चढवला. सरकारकडूनच नेमण्यात आलेल्या शिंदे समितीकडून ५८ लाख कुणबी नोंदी सापडल्या होत्या. समिती सुद्धा तुमचीच होती. समितीचा अहवाल सुद्धा स्वीकारण्यात आला, तर मग आडमुठे कोण? अशी विचारणा मनोज जरांगे पाटील यांनी केली.

ते म्हणाले की, कुणबी आणि मराठा एकच आहे त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे, याशिवाय आम्ही मुंबई सोडणार नाही. हैदराबाद गॅझेट लागू करा अशी त्यांनी मागणी केली. गेल्या १३ महिन्यांपासून अभ्यास सुरू असल्याचा टोला जरांगे यांनी लगावला. ते म्हणाले की आम्हाला सातारा, बॉम्बे गॅझेट लागू करावं. सरकारने मराठ्यांचा विषय समजून घेतला पाहिजे. आमची ही आमची जमीन आहे हे आम्हाला भक्कम माहीत असल्याचं ते म्हणाले.

सरकारकडून देण्यात आलेलं १० टक्के आरक्षण कधीही जाऊ शकतं. आम्हाला आमच्या हक्काची जमीन द्या, भाड्याने घर देऊ नका अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली. ते म्हणाले की दीडशे वर्षांपूर्वी आमच्या नोंदी आहेत, पण सग्यासोयऱ्यांचा आदेश काढून दीड वर्ष झाली तरी त्याची अंमलबजावणी झालेली नाही. मराठा अजूनही संयमी आहे, त्याची व्याख्या देण्यात आली आहे. ज्यांची कुणबी नोंद आहे त्या सगेसोयरे दाखले द्या, आता आंदोलन खूप पुढे गेला असून राज्य अस्थिर करू नका असा आवाहन जरांगे पाटील यांनी केलं. मराठ्यांची कुणबी पोट जात होत नाही का? अशी विचारणा त्यांनी केली.

## सोलापूर शहर डीजेमुक्त व्हावे; यासाठी जिल्हाभरातील डॉक्टरांनी काढला मोर्चा

**सोलापूर/प्रतिनिधी:** शहर डिजेमुक्त व्हावं, यासाठी सोलापूर शहरात चववळ राबविली जात आहे. तर, आज जिल्हाभरातील डॉक्टरांनी सोलापूर शहरातील ऑफिसर्स क्लब ते पोलीस आयुक्त कार्यालयापर्यंत मोर्चा काढून शहर डीजेमुक्त करण्याची मागणी केली. डीजेमुक्त शहर करण्यासाठी काही दिवसांपूर्वी सोलापुरातील ज्येष्ठ नागरिकांनी मोर्चा काढला होता. सोलापूर शहर हे उत्सवांच शहर म्हणून ओळखलं जातं, मात्र, डिजेच्या कर्णकर्कश आवाजामुळे उत्सवांचे विदरूपीकरण होऊ नये, यासाठी हा मोर्चा काढण्यात आला आहे. दरम्यान, या मोर्चाने पारंपरिक वाद्याचा आग्रह धरला असून कोणत्याची सण - जयंती - उत्सवला विरोध नसल्याचे जाहीर केले आहे.अशी माहिती मोर्चे करी डॉ. शिवरत्न शेटे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

## खोटे कागदपत्रं देणाऱ्यांवर गुन्हे दाखल केले जाणार - किरीट सोमय्या



**जालना/प्रतिनिधी:** जालन्यात बेकायदेशीररित्या दिले गेलेले ३६०० जन्म प्रमाणपत्र रद्द करण्यात आल्याची माहिती भाजप नेते किरीट सोमय्या यांनी दिलीये. सोमय्या यांनी आज जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची भेट घेऊन चौकशी केली. ज्यांनी जन्म प्रमाणपत्रासाठी खोटे कागदपत्र सादर केले अशा लोकांवर गुन्हे दाखल केले जाणार आहेत. त्याचबरोबर कोणतीही शहानिशा न करता जन्म प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई केली जाणार असल्याचे सोमय्या यांनी म्हंटले आहे. यासह आधार कार्ड हे केवळ वैयक्तिक माहितीसाठी असून, ते हिंदूस्थानी असल्याचे अधिकार प्राप्त होत नसल्याचे यावेळी सोमय्या यांनी म्हंटले आहे.

## ट्रॅक्टर ट्रॉलीला कंटेनर ट्रकची जोरदार धडक; ८ भाविकांचा जागीच मृत्यू

बुलंदशहर : उत्तर प्रदेशमधील बुलंदशहरात भीषण अपघात घडला आहे. एनएच ३४ वरील अरनिया भागातील घटाल गावात ट्रॅक्टर ट्रॉलीला पाठीमागून कंटेनर ट्रक जोरदार धडक दिल्यानं ८ भाविकांचा मृत्यू झाला. या अपघातात ५० हून अधिक जण जखमी आहेत. घटनास्थळी जिल्हादंडाधिकारी आणि अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षकांसह इतर अधिकारी पोहोचले आहेत.

## प्रभागरचनेवरुन महायुतीत वादाची ठिणगी, नवी मुंबईत भाजपची नाराजी

### अजितदादांच्या राष्ट्रवादीची पुण्यात कोंडी



**पुणे/प्रतिनिधी:** आगामी महापालिका निवडणुकांसाठीच्या प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर पुणे आणि नवी मुंबईत मित्र पक्षांमध्येच कलगीतुरा रंगू लागलाय . नवी मुंबईतील प्रभाग रचना नगर रचना विभागाने एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला अनुकूल ठरेल अशा पद्धतीने तयार केल्याचा आरोप मंत्री गणेश नाईक यांनी केलाय.तर अजित पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसने पुण्यातील प्रभाग रचनेत आपली कोंडी झाल्याचं म्हटलंय. त्यामुळे राज्यातील इतर महापालिकांच्या प्रभाग रचनांचे आराखडे प्रकाशित झाल्यावर मित्र पक्षांच्या एकमेकांबद्दल काय प्रतिक्रिया उमटतात याकडे सगळ्यांचं लक्ष असणार आहे .

नवी मुंबईवर गेली कित्येक दशकं एकहाती सत्ता राखणाऱ्या गणेश नाईकांना आगामी महापालिका निवडणुकीबद्दल मात्र चिंता वाटू लागलीय . ही चिंता दुसऱ्या कोणी नाही तर मित्रपक्षाचे नेते असलेल्या एकनाथ शिंदेनी वाढवल्याचा नाईकांचा दावा आहे. नवी मुंबईतील या प्रभाग रचनेवर शेजारच्या ठाण्याचा प्रभाव असून एकनाथ शिंदेनी त्यांच्याकडे असलेल्या नगर विकास खात्याचा उपयोग करून भाजपला अडचणीत आणणारी प्रभाग रचना करून घेतल्याचा नाईकांचा सूर आहे.

१११ सदस्यीय नवी मुंबई महापालिकेत चार सदस्यांचे २७ ते तीन सदस्यांचा एक असे एकूण २८ प्रभाग असणार आहेत.या प्रभागांची रचना नियमाला धरून नसल्याची तक्रार गणेश नाईकांच्या अनेक समर्थकांनी केलीय. त्यानंतर गणेश नाईकांनी रविवारी त्यांच्या समर्थकांची आणि माजी नगरसेवकांची बैठक घेतली.

नवी मुंबईत जो आरोप भाजपकडून एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेबद्दल करण्यात येतोय तोच आरोप पुण्यात अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून भाजप बद्दल करण्यात येतोय . पुण्यातील प्रभाग रचनेत अजित पवारांच्या शिलेदारांची ठरवून कोंडी करण्यात आल्याचा आरोप माजी महापौर आणि अजित पवारांचे विश्र्वासू दत्तात्रय धनकवडे यांनी केलाय. पुण्यात १६५ नगरसेवकांसाठी चार सदस्यांचे ४० प्रभाग तर पाच सदस्यांचा एक असे एकूण ४१ प्रभाग असणार आहेत. ही प्रभाग रचना करताना नैसर्गिक सीमांचा विचार केला नसून राष्ट्रवादीचे अनेक माजी नागरसेवकी निवडणुकी आधीच स्पर्धेतून बाद होणार आहेत .अनेक माजी नगरसेवकांना एकाच प्रभागातून लढवण्याचा डाव असल्याचा राष्ट्रवादीचा आरोप आहे.

## राजकीय मैदान मारण्यासाठी ‘महायुती’ सज्ज, ‘सर्वांनी साथ द्या’, कोल्हापूरात महाडिकांचे आवाहन!

**कोल्हापूर/प्रतिनिधी:** जिल्ह्यात संपूर्ण राजकीय मैदान मारण्यासाठी महायुती सज्ज आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांसहीत 'गोकुळ'मध्येही सत्ता स्थापन करण्यासाठी सर्वांनी साथ द्यावी, असं आवाहन कोल्हापूरचे खासदार धनंजय (मुन्ना) महाडिक यांनी दहीहंडीच्या कार्यक्रमात केली. यावेळी त्यांनी सतेज (बंटी) पाटील यांच्यावर निशाणा साधला.

जिल्ह्यातील विकासाच्या मुद्द्यावर राजकीय वतुर्ळात बंटी विरुद्ध मुन्ना चर्चा चांगलीच रंगली आहे. मुन्ना महाडिक म्हणाले की, ''महादेवी हत्तीण प्रकरण आणि सर्किट बेंचच्या स्थापनेत कोल्हापूरची एकजूट दिसली. पण चांगल्या कामाला जाणीवपूर्वक विरोध केला जातो. कोल्हापूरात विमानतळ होणार, असे आम्ही सांगत होतो, त्यावेळी माजी पालकमंत्र्यांनी 'महाडिकांचं विमान कुठे घिरट्या घालतंय बघा, असं म्हणत आमची खिल्ली उडवली होती', आता कोल्हापूराचं विमान देशात पहिल्या पाच क्रमांकांमध्ये आहे'', असा दाखला



देत मुन्ना महाडिकांनी विरोधकांवर निशाणा साधला. मुन्ना महाडिक पुढे म्हणाले की, ''गोकूळ दूध संघाला काही मंडळींकडून घरघर लावण्याचा प्रयत्न केला जातोय. महायुतीचा अध्यक्ष असूनही तेथे पूर्ण सत्ता नाही'', अशी खंतही त्यांनी बोलून दाखवली. प्रतिष्ठेची महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा कोल्हापूरात भरवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. कोल्हापूरात सर्किट बेंच झाल्यामुळे आता विकासाचे महाद्वार खुले झाले आहे. या सर्किट बेंचचे खंडपीठात रुपांतर करण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे दहा ते पंधरा दिवसांत प्रस्ताव सादर करणार असल्याचेही खासदार मुन्ना महाडिक यांनी सांगितले.

## येमेनच्या राजधानीत हुथी बंडखोरांवर इस्रायली हवाई हल्ले

कैरो : येमेनची राजधानी सना शहरावर रविवारी स्थानिक वेळेनुसार पहाटे इस्रायली हवाई हल्ले झाले. स्थानिक माध्यमांच्या वृत्तानुसार, इस्रायलचा हा हल्ला इस्रायलवर क्लस्टर बॉम्ब टाकल्यानंतर काही दिवसांनीच झाला आहे. हुथी बंडखोरांनी चालवलेल्या 'अल-मसिराह चॅनल'ने या हल्ल्यांचं वृत्त दिलं आहे. १७ ऑगस्टनंतर बंडखोरांच्या ताब्यात असलेल्या सना येथे हा पहिला हल्ला आहे. इस्रायलने त्यावेळी म्हटलं होतं की, या हल्ल्यांमध्ये ऊर्जा प्रकल्पांना लक्ष्य करण्यात आलं होतं, जे बंडखोर वापरत असल्याचे मानले जाते.

## शेतकऱ्यांना कर्जमाफी कधी आणि कशी मिळणार? अजित पवार यांचा पुन्हा ‘यू टर्न’

दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी:** राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी रविवारी (२४ ऑगस्ट) साताऱ्यातील दहिवडी येथे पक्ष प्रवेशाच्या कार्यक्रमानिमित्त उपस्थित राहून माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीविषयी स्पष्ट भूमिका मांडली.

''आम्ही कर्जमाफीपासून कधीच बाजूला गेलो नाही. कर्जमाफी देणार नाही, असं आम्ही कधीच म्हटलं नाही. यासंदर्भात एक समिती नेमण्यात आली आहे आणि ती लवकरच सविस्तर माहिती देईल. योग्य वेळ येईल, तेव्हा कर्जमाफीही केली जाईल,'' असं अजित पवार यांनी सांगितलं. तथापि, त्यांनी थेटपणे कर्जमाफी केव्हा दिली जाईल, याबाबत कोणतीही ठोस घोषणा केली नाही.

कर्जमाफीवरून पुन्हा अजित पवारांचं घुमजाव : दरम्यान, अजित पवारांनी शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यांवर अनेकदा वेगवेगळी विधानं केली आहेत. विशेष म्हणजे, 'आता कर्जमाफी करू' असं सांगणाऱ्या अजितदादांनी याआधी मात्र, 'कर्जमाफीचं आश्वासन कोणी दिलं होतं? मी दिलं होतं का?' असा थेट प्रतिप्रश्नच कोल्हापुरात पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर मे २०२५ मध्ये केला होता. त्यावेळी त्यांच्यावर प्रचंड टीका झाली होती. पण यावेळी मात्र, उपमुख्यमंत्र्यांनी 'वेळ आल्यावर कर्जमाफी करू', असं सांगत सावध पवित्रा घेतला आहे.

'शेतकऱ्यांसाठी सरकारकडून विविध सवलती' : ''फक्त कर्जमाफी नव्हे, तर सरकारवर इतरही अनेक जबाबदाऱ्या आहेत. राज्याचा गाडा हाकायचा आहे,'' असं स्पष्ट करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांसाठी सरकारकडून सुरू असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. ते पुढे म्हणाले, ''केंद्र आणि राज्य सरकार मिळून शेतकऱ्यांना वर्षाला १२ हजार रुपये देतात. तसेच, तीन, पाच आणि साडेसात हॉर्सपॉवर क्षमतेच्या पंपाच्या वीजबिलांची माफी करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत राज्य सरकार महावितरणला वीजबिलापोटी २० हजार कोटी रुपये भरते.''

कर्जमाफीच्या आश्वासनावर ठाम : महायुतीच्या जाहिरनाम्यात दिलेल्या कर्जमाफीच्या आश्वासनावर आम्ही ठाम आहोत,'' असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केलं. कर्जमाफीच्या अंमलबजावणीसाठी एक समिती नेमण्यात आल्याचेही त्यांनी सांगितलं. ''एखाद्या निर्णयाची अंमलबजावणी करताना आर्थिक बाजू तपासावी लागते,'' असे सांगत त्यांनी यामध्ये वेळ लागू शकतो, असे संकेत दिले. ''शेतकऱ्यांच्या हिताचे धोरण आखताना फक्त कर्जमाफीपुरतंच न थांबता शेतकऱ्यांना आणि त्यांच्या पिकाला चांगला दर मिळावा, तसेच शासकीय योजना प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचाव्यात,'' यासाठी प्रयत्न सुरू असल्याचंही अजित पवार यांनी नमूद केलं.




व्होट चोरीच्या आरोपांवर अजित पवार काय म्हणाले?: ''इकडे काही झालं की व्होट चोरीचा आरोप केला जातो, पण दिल्ली, तामिळनाडू, कर्नाटका, तेलंगाणा, पश्चिम बंगालमध्ये एनडीए विरोधी पक्षांचं सरकार आलं, तेव्हा काहीच बोललं जात नाही,'' अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काँग्रेसकडून होणाऱ्या व्होट चोरीवरील आरोपावर दिली. त्याच वेळी, राज ठाकरे यांनी गणपती आगमनाच्या दिवशी उद्धव ठाकरे यांना घरी येण्याचं आमंत्रण दिल्याच्या संदर्भात त्यांनी सांगितलं, ''एक भाऊ दुसऱ्या भावाच्या घरी जाणार आहे. त्यात एवढं काय विशेष?'' असं ते म्हणाले.

## भारत रशिया मैत्रीचा नवा अध्याय

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकेखोरपणामुळे भारत आणि अमेरिकेचे संबंध कमालीचे दुरावले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क ( टेरीफ ) लावल्यानंतर दोन्ही देशात कटुता निर्माण झाली आहे. सुरुवातीला भारतावर २५ टक्के अतिरिक्त शुल्क ( टेरीफ ) लावणाऱ्या ट्रम्प यांनी भारताने रशियाशी तेल खरेदी करू नये. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने रशिया त्या पैशातून शस्त्र खरेदी करत आहे आणि त्यामुळेच रशिया युक्रेन युद्ध थांबत नाही. भारत रशियाकडून तेल खरेदी करून एकप्रकारे रशिया युक्रेन युद्धाला उत्तेजन देत आहे असा जावई शोध लावतानाच ट्रम्प यांनी भारताने रशियाकडून तेल खरेदी केले तर अमेरिका भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावेल असा इशारा दिला अर्थात भारताने त्यांच्या इशाऱ्याकडे डोळेझाक केले त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावले. या अतिरिक्त शुल्कामुळे भारत घाबरून रशियाशी असलेला व्यवहार थांबवेल आणि रशियाकडून तेल खरेदी करण्याचे थांबवेल असे ट्रम्प यांना वाटले होते झाले मात्र उलटेच. भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे तर थांबवले नाहीच उलट रशियाशी असलेले जुने मैत्रीचे संबंध आणखी दृढ करण्याचा प्रयत्न केला. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी फोनवरून संवाद साधत चर्चा केली. आता भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर हे रशियाच्या दौऱ्यावर गेले आहेत. अमेरिकेशी आलेल्या कटुतेच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्वाची असल्याने या भेटीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागून आहे. एस जयशंकर यांनी या भेटीत रशियाचे राष्ट्राध्यक्ष वाल्दिमिर पुतिन यांची भेट घेतली या भेटीत अनेक विषयावर चर्चा झाली मात्र भेटीचा मुख्य अजेंडा हा अमेरिकेची दादागिरी हाच होता. या बैठकीत भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी पुतिन यांच्यासमोर अमेरिकेच्या दुहेरी नीतीचा पर्दापाश केला त्यामुळे अमेरिकेला योग्य तो संदेश दिला गेला. अमेरिकेची दुहेरी नीती म्हणजे ज्या अमेरिकेने भारत रशियाकडून तेल खरेदी करतो म्हणून भारतावर ५० टक्के शुल्क लावले त्याच अमेरिकेने चीनवर मात्र अतिरिक्त शुल्क लावण्यास ९० दिवसांची स्थगिती दिली. विशेष म्हणजे चीन रशियाकडून भारतापेक्षा अधिक प्रमाणात तेल खरेदी करतो. भारताला दम देऊन अतिरिक्त शुल्क वसूल करणारा अमेरिका मात्र चीन समोर फुसका बार ठरतो हेच यातून सिद्ध होते. अमेरिकेने भारतावर अतिरिक्त शुल्क लावल्याने दोन्ही देशांच्या संबंधात कटुता निर्माण झाली असल्याने अनेकांनी चिंता व्यक्त केली असली तरी म्हणतात ना वाईटातूनही चांगले घडते तसेच इथेही घडत आहे. अमेरिका आणि भारताचे संबंध बिघडले असताना भारत आणि रशियाचे संबंध मात्र पूर्वीप्रमाणे दृढ होत आहे. रशिया हा तसा भारताचा सर्वात विश्वासू आणि सर्वात जुना मित्र. पंडित नेहरूंपासून सुरू झालेली ही मैत्री आजही कायम आहे. ज्या ज्या वेळी भारतावर संकट आले त्या त्या वेळी रशियाने आपली मैत्री निभावली हे मान्यच करावे लागेल. १९६५ आणि १९७१ साली झालेल्या भारत पाकिस्तान युद्धात रशिया भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला या उलट अमेरिकेने प्रत्येक वेळी पाकिस्तानची तळी उचलली. आताच्या ऑपरेशन सिंदूरमधील अमेरिकेची भूमिकाही पाक धार्जिणीच होती हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. मधल्या काळात भारत आणि रशियाचे संबंध पूर्वीप्रमाणे दृढ राहिले नव्हते. विशेषतः ट्रम्प पहिल्यांदा सत्तेत आल्यापासून भारत अमेरिकेकडे झुकू लागला असे रशियाला वाटत होते अर्थात त्याला नमस्ते ट्रम्प, हाव दि मोदी हे कार्यक्रमही कारणीभूत होते शिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी ट्रम्प यांचा माय डिअर फ्रेंड डोनाल्ड असा जाहीर उल्लेख करत असल्याने तसा रशियाचा समज झाला आणि ते स्वाभाविकच आहे. त्यामुळेच रशिया चीनकडे झुकली होती आता ट्रम्प यांच्या या कृतीने पुन्हा दोन्ही मित्र एकत्र आले आहेत. रशिया ही महासत्ता आहे आणि भारत होऊ घातलेली महासत्ता आहे. हे दोन देश पुन्हा एकत्र आले त्याचा जागतिक पटलावर मोठा परिणाम होणार आहे. त्याचा सर्वाधिक फटका अर्थात अमेरिकेलाच होणार आहे असे जाणकार सांगतात. अमेरिकेच्या संयुक्त राष्ट्रातील माजी राजदूत निकी हॅले यांनी याच मुद्द्यावर बोट ठेवत ट्रम्प यांच्यावर टीका केली आहे. त्यांनी म्हटले आहे ट्रम्प यांच्या या कृतीमुळे अत्यंत महत्वाच्या काळात भारत अमेरिका संबंध तणावपूर्ण बनले आहे. ट्रम्प चीनसारख्या प्रतिस्पर्ध्यांशी सौम्य भूमिका घेताना भारतासारख्या सौहार्दपूर्ण संबंध असलेल्या देशाशी संबंध बिघडवत आहे. ट्रम्प यांच्या धोरणामुळे भारत, रशिया आणि चीन यांच्यातील परस्पर संबंध बळकट होईल त्याचा फटका अखेर अमेरिकेलाच बसेल. निकी हॅले यांना जे समजते ते ट्रम्प यांना का समजत नाही हा प्रश्न आहे. पण काहीही असो ट्रम्प यांच्या हेकोखोरपणामुळे भारत रशिया मैत्री संबंधाचा नवा अध्याय लिहिला जात आहे हे मात्र नक्की .

# तुरुंगातून सरकार चालवू शकतो का? विरोधकांना जेलमधून पीएम–सीएम हाऊस चालावायचं आहे : अमित शाह

नवी दिल्ली : कोणताही मुख्यमंत्री, पंतप्रधान किंवा मंत्री तुरुंगातून सरकार चालवू शकतो का? विरोधकांना तुरुंगातून सरकार चालवण्याचा पर्याय हवा असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले आहे. संविधान (१३० वी दुरुस्ती) विधेयकाविरुद्ध विरोधकांचा निषेध चुकीचा असल्याचे ते म्हणाले. ते म्हणाले की, 'कोणताही मुख्यमंत्री (मुख्यमंत्री), पंतप्रधान (पंतप्रधान) किंवा मंत्री तुरुंगातून सरकार चालवू शकतो का? त्यांना तुरुंगातून सरकार चालवण्याचा पर्याय हवा आहे.' एएनआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत शाह यांनी जगदीप धनखड यांचा राजीनामा, त्यांची स्वतःची अटक आणि संसदेत विरोधकांचा निषेध यावर चर्चा केली. ते म्हणाले की, जर देशाचे पंतप्रधान कधी तुरुंगात गेले तर पंतप्रधानांनी तुरुंगातून सरकार चालवणे योग्य आहे का? मुख्यमंत्र्यांनी तुरुंगातून सरकार चालवणे योग्य आहे का? ज्या पक्षाला बहुमत असेल, त्या पक्षातील दुसरा कोणीतरी येऊन



सरकार चालवेल. जर तुम्हाला जामीन मिळाला तर तुम्ही पुन्हा पदभार स्वीकारू शकता. केंद्राने २० ऑगस्ट रोजी लोकसभेत संविधान (१३० वी दुरुस्ती) विधेयक सादर केले. त्यात अशी तरतूद आहे की पंतप्रधान–मुख्यमंत्री किंवा कोणत्याही मंत्र्यांना ३० दिवस अटक किंवा ताब्यात घेतल्यास त्यांना राजीनामा द्यावा लागेल. अट अशी आहे की ज्या गुन्ह्यासाठी अटक किंवा अटक झाली आहे त्याला ५ वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षेची तरतूद असावी. विरोधी पक्ष याचा विरोध करत आहे.

अमित शाह म्हणाले की, मनमोहन सिंग सरकारने लालू यादव यांना वाचवण्यासाठी अध्यादेश आणला. राहुल गांधींनी तो का फाडला, त्याचे औचित्य काय होते? जर त्या दिवशी नैतिकता होती, तर आज नैतिकता नाही का, कारण तुम्ही सलग तीन निवडणुका हरला आहात. प्रत्यक्षात, २०१३ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने राजकारणात गुन्हेगारांचा प्रवेश रोखण्याचा निर्णय दिला होता. यामध्ये २ वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षा झालेल्या राजकारण्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले आणि त्यांना ६ वर्षांपेक्षा जास्त काळ निवडणूक लढवण्याची परवानगी नव्हती. मनमोहन सरकारने या निर्णयाविरुद्ध अध्यादेश आणला. या दरम्यान, राहुल यांनी रस्त्यावरच अध्यादेश फाडण्याबद्दल बोलले.

जगदीप धनखड यांच्या राजीनामा

धनखड यांनी त्यांच्या कार्यकाळात संविधानानुसार चांगले काम केले. वैयक्तिक आरोग्याच्या समस्यांमुळे त्यांनी राजीनामा दिला आहे.

संसदेत सीआयएसएफची तैनाती

'सभापती आदेश देतात तेव्हाच मार्शल सभागृहात प्रवेश करतात. काही डाव्या विचारसरणीच्या लोकांनी संसदेत फवारणी केल्याच्या मोठ्या घटनेनंतर हा बदल झाला आहे. त्यांना (विरोधी पक्षांना) सबबींची आवश्यकता आहे. ते जनतेत गोंधळ निर्माण करू इच्छितात. तीन निवडणुका गमावल्यानंतरच्या या निराशेच्या पातळीमुळे त्यांचा विवेक उडाला आहे.'

रेड्डी उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार

'त्यांनी सलवा जुडूम नाकारला आणि आदिवासींचा स्वसंरक्षणाचा अधिकार रद्द केला. म्हणूनच या देशात नक्षलवाद दोन दशकांहून अधिक काळ टिकला. माझा असा विश्र्वास आहे की डाव्या विचारसरणीने (विरोधकांना सुदर्शन रेड्डी निवडण्यासाठी) निकष लावला असावा.' उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत विरोधी पक्षाचे उमेदवार बी सुदर्शन रेड्डी एनडीएचे उमेदवार सीपी राधाकृष्णन यांच्याविरुद्ध उभे आहेत.

मी दुसऱ्याच दिवशी राजीनामा दिला

माझ्यावर आरोप झाल्यानंतर सीबीआयने मला बोलावताच, मी दुसऱ्याच दिवशी राजीनामा दिला. मला नंतर अटक करण्यात आली. खटला नंतर ऐकवण्यात आला, निकालही आला, ज्यामध्ये असे म्हटले गेले की हा राजकीय सूडबुद्धीचा खटला आहे. मी पूर्णपणे निर्दोष आहे. मला आधी जामीन मिळाला होता, निकाल नंतर आला. हा राजकीय सूडबुद्धीचा खटला होता, माझा त्याच्याशी काहीही संबंध नव्हता. मला संशयाच्या आधारे निर्दोष सोडण्यात आले नाही, माझा खटला रद्द करण्यात आला. मला या प्रकरणात ९६व्या दिवशी जामीन मिळाला, पण मी मंत्री म्हणून शपथ घेतली नाही. माझ्यावरील सर्व आरोप रद्द होईपर्यंत मी कोणत्याही संवैधानिक पदासाठी शपथ घेतली नाही.

# ठाकरे बंधूंना नडण्यासाठी भाजपने मुंबईच्या अध्यक्षपदी आक्रमक नेता निवडला

**मुंबई/प्रतिनिधी:** भाजपचे आमदार अमित साटम यांची मुंबई भाजपच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबत आज महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ही घोषणा करण्यात आली. मुंबईतील नागरी प्रश्नांची चांगली जाण आहे. अमित साटम यांनी विधानसभा आणि विविध व्यासपीठांवर भाजपची बाजू आक्रमकपणे मांडण्याचे काम केले आहे. यामुळे अमित साटम यांना मुंबई भाजपच्या अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली.

कोण आहेत अमित साटम?

अमित साटम हे भारतीय जनता पक्षाचे आमदार आहेत. ऑक्टोबर २०१४ पासून ते सलग तिसऱ्या कार्यकाळात अंधेरी पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य (आमदार) म्हणून काम करत आहेत. १५ ऑगस्ट १९७६ रोजी मुंबई, महाराष्ट्र येथे जन्मलेल्या साटम यांनी १९९८ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या मिठीबाई कॉलेज ऑफ आर्ट्समधून राज्यशास्त्र



आणि समाजशास्त्र या विषयात बॅचलर ऑफ आर्ट्स पूर्ण केले. पुढे त्यांनी महात्मा गांधी मिशन्स इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, मुंबई विद्यापीठातून मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (कार्मिक) ची पदवी घेतली, २००० मध्ये पदवी प्राप्त केली.

अंधेरी पश्चिम मतदारसंघ अस्तित्त्वात आल्यानंतर २००९ मध्ये याठिकाणी पहिल्यांदा निवडणूक झाली. त्यावेळी काँग्रेसच्या अशोक जाधव यांनी अंधेरी पश्चिममध्ये विजय मिळवला. मात्र, २०१४ च्या मोदी लाटेत भाजपच्या अमित साटम यांनी अशोक जाधव यांचे वर्चस्व मोडून काढत याठिकाणी विजय मिळवला होता. २०१९ मध्येही अमित साटम यांनी अंधेरी पश्चिममध्ये विजयाची पुनरावृत्ती केली होती. त्यानंतर २०२४ मध्येही काँग्रेसच्या अशोक जाधवांचा पराभव करत अंधेरी पश्चिम मतदारसंघात विजयाची हॅट्रिक साधली.

२००९ च्या पहिल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे अशोक जाधव यांनी या जागेवरून विजय मिळवला. त्यानंतर त्यांनी शिवसेनेचे उमेदवार विष्णू कोरगावकर यांचा ३२ हजार मतांनी पराभव केला. २०१४ च्या निवडणुकीत अंधेरी पश्चिम मतदारसंघातून भाजपचे अमित साटम विजयी झाले. २०१४ च्या निवडणुकीत अमित साटम यांनी काँग्रेसच्या अशोक जाधव यांचा २४ हजार मतांनी पराभव केला होता. २०१९ मध्ये अमित साटम यांनी पुन्हा अशोक जाधव यांचा १८,९६२ मतांनी पराभव केला. २०२४ च्या निवडणुकीत अमित साटम यांना ८४, ९८१ मते मिळाली. त्याचवेळी काँग्रेसचे अशोक जाधव यांना ६५, ३८२ मते मि ळाली. अमित साटम यांनी अशोक जाधव यांचा १९, ५९९ मतांनी पराभव केला.

## योगींवर बनवलेल्या चित्रपटाला मुंबई उच्च न्यायालयाने दिली मंजुरी

**मुंबई/प्रतिनिधी:** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावर आधारित अजेय: द अनटोल्ड स्टोरी ऑफ अ योगी या चित्रपटाला मुंबई उच्च न्यायालयाने प्रदर्शित करण्याची परवानगी दिली आहे. न्यायालयाने सोमवारी सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन (सीबीएफसी) ला चित्रपटात कोणतेही कट किंवा बदल न करता प्रदर्शित करण्याचे निर्देश दिले. खरं तर, सीबीएफसीने प्रमाणपत्र देण्यास नकार दिल्यानंतर, चित्रपटाच्या निर्मात्यांनी न्यायालयात धाव घेतली. अशा परिस्थितीत, न्यायालयाने स्वतः २१ ऑगस्ट रोजी चित्रपट पाहिला आणि म्हटले की, चित्रपटात असे काहीही नाही जे त्याला प्रमाणपत्र देण्यापासून रोखू शकेल. तथापि, सुनावणीदरम्यान, सीबीएफसीचे वकील राम आपटे यांनी न्यायालयाला सांगितले की, चित्रपटात काही अश्लील दृश्ये आहेत आणि त्यामुळे मुख्यमंत्री आदित्यनाथ यांच्या प्रतिमेला हानी पोहोचू शकते.

अशा परिस्थितीत, न्यायालयाने वकिलाला विचारले की, तुम्ही चित्रपट पाहिला आहे का, ज्याला त्यांनी नकार दिला. यावर न्यायालयाने म्हटले की, चित्रपटात कोणतीही अश्लीलता नाही किंवा मुख्यमंत्र्यांच्या प्रतिमेला हानी पोहोचवणारा कोणताही देखावा नाही. ज्या प्रत्येक दृश्याबद्दल तक्रार होती, ते आम्ही काळजीपूर्वक पाहिले, परंतु चित्रपटात काहीही चुकीचे आढळले नाही. न्यायालयाने पुढे असे सुचवले की, जर सीबीएफसीला हवे असेल तर ते चित्रपटात लिहू शकते की ही कथा पूर्णपणे कल्पनेवर आधारित आहे. याचिकाकर्त्यांनी न्यायालयाला एक नवीन अस्वीकरण दिले, जे न्यायालयाने स्वीकारले आणि ते चित्रपटात जोडावे असे म्हटले.

# उत्सव गणेशाचा, ठेवा संस्कृतीचा...

महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव फार मोठ्या स्वरूपात साजरा केला जातो. सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात कशी झाली हे आपण सारे जाणतोच. ब्रिटिशांच्या विरोधात सर्वांनी एकत्रितपणे येऊन लढण्यासाठी लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली.

जन्माष्टमी, गोपाळकाला हे सणही सार्वजनिकरीत्या साजरे होऊ लागले. समाज प्रबोधनाद्वारे जनतेत जागृती निर्माण करण्याचे कार्य या उत्सवांद्वारे करण्यात आले. एकेकाळी समाजप्रबोधनाचे कार्य करण्यासाठी सुरू केलेले हे सार्वजनिक सण हळूहळू आपल्या संस्कृती व परंपरेची वाट सोडून वेगळेच वळण घेऊ लागले आहेत. गणेश मंडळांमध्ये हळूहळू चढाओढ निर्माण होऊ लागली आहे. पूर्वीच्या काळी सार्वजनिक गणेशोत्सवात सर्वजण एकत्र येऊन काम करायचे. गणेशोत्सवामध्ये विविध स्पर्धा घेण्यात यायच्या. रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा इत्यादी स्पर्धांमुळे प्रत्येकाच्या अंगातील सुप्त गुणांना वाव मिळायचा. व्यासपीठावर बोलण्याची, नृत्य करण्याची भीड चेपली जायची. एकत्रितपणे प्रसाद, एकत्रितपणे आरत्या व्हायच्या, सामाजिक उपक्रम राबविले जायचे. पण आता काळाच्या ओघात सगळंच बदललं आहे. जशी दहीहंडी उत्सवात उंच मानवी मनोऱ्यांचे थरावर थर रचण्याची जीवघेणी चुरस चालू असते त्याचप्रमाणे गणेशोत्सवात बाप्पाच्या उंचच उंच मूर्तींसाठी सुद्धा चढाओढ सुरू असते. अर्थात काही छोटी–मोठी मंडळे याला अपवाद आहेत म्हणा जी विविध उपक्रम राबवून समाजात जागरूकता निर्माण करतात; परंतु बहुतांशी गोविंदा पथके आणि गणेश मंडळे मात्र समाजप्रबोधन आणि सामाजिक ऐक्यासाठी सुरू झालेल्या या उत्सवांचा मूळ उद्देशच विसरून गेली आहेत. डीजेवर नाचगाणी, मद्य सेवन, जुगार आणि गुंडागर्दीने आजचे सार्वजनिक उत्सव गाजू लागले आहेत. त्यातच आता या उत्सवांना राजकीय नेत्यांनी आपल्या फायद्यासाठी उचलून धरल्याने याला आता राजकारणाची किनार लाभली आहे. कोट्यवधी रुपयांची



आर्थिक उलाढाल या उत्सवाच्या निमित्ताने नेते, पुढारी करताना दिसतात. गणेशमूर्ती, सजावट, प्रसाद, तसेच इतर संबंधित वस्तूंच्या खरेदी–विक्रीतून मोठा आर्थिक व्यवहार होतो. यामुळे, या उत्सवाचे बाजारीकरण वाढले आहे. काही वेळा या बाजारीकरणामुळे सामाजिक आणि धार्मिक भावनांना ठेच पोहोचते. कुठेतरी हे सगळं थांबवायला हवे. या उत्सवांचे धार्मिक विचार, त्याचे पावित्र्य राखले गेले पाहिजे. आपला हा सांस्कृतिक ठेवा आपल्यालाच जपायला हवा तरच आपली परंपरा आणि आपल्या संस्कृतीची बीजे आपण आपल्या पुढच्या पिढीच्या मनात रुजवू शकू.

उत्सवांचे बाजारीकरण कमी करण्यासाठी, समाजात जनजागृती करणे आणि उत्सवांचा खरा अर्थ लोकांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. गणेशोत्सवात पर्यावरणाची काळजी घेणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. आतिषबाजीमुळे होणारे प्रदूषण देखील तितकेच घातक होत चालले आहे. त्याला देखील आवर घालायला हवा. पुढील पिढीला आपला सांस्कृतिक वारसा देण्यासाठी या उत्सवांच्या बाजारीकरणाच्या जाळ्यातून आपल्याला त्यांना बाहेर काढावे लागेल. समाजप्रबोधन आणि राष्ट्रीय ऐक्यासाठी सुरू झालेले हे गणेशोत्सव चुकीच्या दिशेने जाता कामा नये. चौदा विद्यांचा अधिपती असलेल्या या गणेशाच्या उत्सवाचा सन्मान राखला गेला पाहिजे. त्यातले बाजारीकरण व राजकारण थांबवायला पाहिजे. तसेच या उत्सवाच्या धार्मिक भावना जपून सांस्कृतिक परंपरेचे जतन केले पाहिजे आणि यासाठी महाराष्ट्रातील सर्व छोट्या मोठ्या मंडळांनी एकत्र येऊन ही भूमिका पार पाडली पाहिजे. थोडक्यात सांगायचे झाले उत्सवांची सामाजिक बांधिलकी जपत सार्वजनिक उत्सवांतून नवीन युवा पिढी घडवायला हवी. यातला हरवत चाललेला सांस्कृतिक ठेवा आणि परंपरेशी माणसांना जोडून ठेवणारी नाळ ही आपणच जपायला हवी...!

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### ''सिंधुदुर्गच्या राजा'' चे जल्लोषात आगमन



दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी:** सिंधुदुर्ग वासियांच्या लाडक्या सिंधुदुर्गच्या राजाचे आज संध्याकाळी कुडाळमध्ये वाजत गाजत मंडपात आगमन झाले. आमदार निलेश राणे यांच्या संकल्पनेतून २००९ मध्ये ''सिंधुदुर्गचा राजा''ची प्रतिष्ठापना कुडाळ येथे करण्यात आली असून, जिल्ह्यातील तसेच जिल्ह्याबाहेरून भक्तगण राजाच्या दर्शनासाठी येतात. यंदा सिंधुदुर्गच्या राजाचे १७ वे वर्ष असून यावर्षी २१ दिवस हा गणराय विराजमान असणारआहे.

### कल्याण परिमंडळ ३ पोलिसांची मोठी कारवाई; आंतरराज्य गांजा तस्करांचे रॅकेट उध्वस्त



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण परिमंडळ ३ च्या पोलिसांनी अवघ्या २२ दिवसात आंतरराज्य गांजा तस्कर टोळीचा पर्दाफाश केला. कल्याण जवळ असलेल्या आंबिवली येथे एका तरुणाला अटक करत त्याच्याकडून १०० ग्राम गांजा जप्त केला होता. मात्र गांजा येतो कुठून याचा तपास कल्याण पोलिसांनी सूरु केला. हा तपास कल्याणहुन पुणे, सोलापूर त्यानंतर थेट आंध्रप्रदेश, विशाखापट्टणम येथील जंगलापर्यंत पोहचला. या आंतरराज्य गांजा तस्कर टोळीचे धागे दोरे जोडत पोलिसांनी पुणे, सोलापूर, आंध्रप्रदेश, विशाखापट्टणम येथील जंगलात छापे टाकत एकूण १३ गांजा तस्करांना बेड्या ठोकल्या आहेत. धक्कादायक म्हणजे जंगलात मोबाईल नेटवर्क नसल्याने हे गांजा तस्कर वॉकी टॉकीचा वापर करत होते. अत्यंत हुशारीने चलाखीने ही गांजा तस्करी सुरू होती. पोलिसांनी या सर्च ऑपरेशन दरम्यान १३ जणांकडून २८ लाख, ७५ हजारांचा ११५ किलो गांजा जप्त केला. गांजा तस्करीसाठी वापरण्यात आलेले १ पिस्टल, कारतूस, २ वॉकी टॉकी, २ कार, रिक्षा, बुलेट, दुचाकी देखील जप्त करण्यात आल्या आहेत.





### परवाने स्वत:च्याच मुलांना कार्यकर्ते वाऱ्यावर, मद्य विक्रीच्या परवान्यावरून लंकेचा खोचक टोला



**अहिल्यानगर/प्रतिनिधी:** राज्यातील ४१ मध्ये उद्योगांना तब्बल ३२८ परवाने देण्यात आले असून यामध्ये अनेक सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील दिग्गज नेत्यांच्या कुटुंबीय व निकटवर्ती यांचा थेट सहभाग असल्याचे समोर आले आता याच अनुषंगाने खासदार निलेश लंके यांनी सत्ताधाऱ्यांवरती जोरदार फटकेबाजी केली. परवाने देखील नेत्यांच्याच मुलांना मात्र कार्यकर्ते हे वाऱ्यावरच अशा शब्दात खासदार निलेश लंके यांनी सत्ताधाऱ्यांना खोचक टोला लगावला. यावेळी बोलताना खासदार निलेश लंके म्हणाले की ४०% मद्य विक्रीचे परवाने हे आपल्याच जवळच्या नेते मंडळींना दिले आहे. मद्य विक्रीचे परवाने हे जर आपल्या जवळच्या कार्यकर्त्यांना दिल्या असते तर किमान आम्ही समाधान मानले असते मात्र कार्यकर्त्यांनाही न देता केवळ स्वत:च मध्य विक्रीचे परवाने घेता येत कार्यकर्त्यांना बळ द्यायचं बाजूलाच राहिलं. हे सर्व चुकीचे आहे अशा शब्दात एक प्रकारे खासदार निलेश लंके यांनी सत्ताधाऱ्यांवरती मध्य विक्रीच्या परवान्यावरूननिशाणासाधला.

# जीव गेला तरी बेहत्तर मात्र ओबीसींचे आरक्षण संपू देणार नाही - लक्ष्मण हाके यांचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी:** रात्रंदिवस मी शेकडो किलोमीटर फिरतोय एकही पोलीस मागे पुढे नाही. मात्र, जीव गेला तरी बेहत्तर, गोळ्या घातल्या तरी बेहत्तर मात्र ओबीसींचे आरक्षण संपू देणार नाहीत. असा इशारा लक्ष्मण हाके यांनी माध्यमांशी बोलताना दिला आहे. यावेळी लक्ष्मण हाके म्हणाला की, आमचं म्हणणं एवढंच होतं की तुम्ही सत्ताधारी पक्षाचे आमदार असताना निवडून आलेले असताना, एवढे मोठे बॅनर लावले. आमच्या आरक्षणाची झोपडी उध्वस्त होत असताना तुम्ही एक बाजू कसे काय घेऊ शकता ? जर जरांगेंच्या आंदोलनाला यांना जाहीर पाठिंबा द्यायचा आहे, जरांगेच्या आंदोलनात सहभागी व्हायचंय, लाखो रुपयांची करोडो रुपयांचे बॅनर रस्त्या रस्त्यावर लावले आहेत. विजयसिंह पंडित, प्रकाश सोळुंके आणि बजरंग सोनवणे तुम्ही तिघांनी पहिले राजीनामे द्या आणि जरांगेंच्या आंदोलन सहभागी व्हा. तुम्ही विधानसभेत आणि देशाच्या संसदेत सर्व लोकांचे प्रतिनिधित्व करता, आता मी त्यांच्यासमोर बोलत होतो तर ते पळून गेले. काय असतं सोशल जस्टीस ? काय आहे मंडल आयोग कुणाला आरक्षण दिलं जातं ? समोरासमोर बस म्हणावं. अरे भ्याड हल्ला काय करतो, लपून-छपून,काल माझा पुतळा जाळला. याच्याकडे कार्यकर्ते नव्हते, माझ्या समाजातल्या पोरांना हाताशी धरून याने हे केलं. आज मी गेवराईच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात आलो, तर या लोकांनी माझ्यावर दगडफेक केली. ३६ लाख बोगस ओबीसी सर्टिफिकेट काढले गेले. मुख्यमंत्री महोदय लाखो सर्टिफिकेट बोगस काढले असतील तर, या गावगाड्यातला मागासलेला झेडपी मेंबर बनेल का ? त्यांच्या स्पर्धेत हा बांधव टिकेल का ? सांगा मुख्यमंत्री



महोदय किती दिवस आम्ही संविधानाची भाषा बोलायची. मला वाटतं या लोकांनी शब्द केलाय. राजीनामा देऊन आंदोलनात या. मी चौकात आलो होतो,बाईट देणार होतो. मात्र, पुन्हा दगडफेक सुरू झाली. पंडित, सोळुंके, सोनवणे तुम्हाला आमची मते पडली का नाही तुम्ही सांगा ?. महाराष्ट्रात अराजकता निर्माण होत आहे. मुख्यमंत्र्यांची आई बहीण काढली जाते. तर आमचं काय?, त्यामुळे मुख्यमंत्री महोदय लवकर काय ते निर्णय घ्या, असे आवाहनही यावेळी लक्ष्मण हाके यांनी मुख्यमंत्र्यांना केले आहे.

## पनवेलमध्ये पर्यावरणपूरक कागदापासून गणपती बाप्पाच्या मूर्ती

दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** यंदाच्या गणेशोत्सवात पनवेलकरांना एक वेगळीच झलक पाहायला मिळणार आहे. प्लास्टर ऑफ पॅरिस आणि रंगीत रसायनांच्या ऐवजी पर्यावरणपूरक कागदी पेपर पासून बनवलेल्या गणपतीच्या मूर्तींना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. तळोजा मधील नितलस गावातील स्थानिक तरुण प्रत्येक मोरेश्वर पवार या कलाकारांनी पर्यावरण पूरक संकल्पनेला प्रत्यक्षात आणले असून, जुन्या कागदाचे पुनर्वापर करून गणरायाच्या आकर्षक मूर्ती घडवल्या आहेत. या



मूर्तींची खासियत म्हणजे त्यांचे विसर्जन केल्यावर पाण्यात कोणतेही प्रदूषण होत नाही, उलट पाण्यात सहज विरघळून पर्यावरणाचे रक्षण करते. गणेशभक्तांना अशा मूर्ती खरेदी करण्यासाठी मोठी उत्सुकता दिसून येत असून, पर्यावरणप्रेमी पनवेल मधील मंडळांनी सुद्धा यंदा अशाच मूर्तींची प्रतिष्ठापना करण्याचा संकल्प केला आहे.कागदी गणपती मूर्ती हा भविष्यातील उत्तम पर्याय आहे. या माध्यमातून गणेशोत्सवाच्या आनंदात पर्यावरण जपण्याचा संदेश दिला जातो. पनवेलकरांच्या या उपक्रमामुळे संपूर्ण कोकण विभागात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे नवे उदाहरण घालून दिले आहे.तर, पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी पर्यावरणक पूरक गणेशमूर्ती बनविण्यास प्राधान्य देण्यात येत असल्याची माहिती मूर्तिकार प्रतिक मोरेश्वर पवार यांनी दिली आहे.

## सत्तेसाठी भाजप काहीही करू शकतो : बाळासाहेब थोरात

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी:** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत.- वातावरण गरम व्हायला सुरुवात झाली आहे. आम्ही सुद्धा कार्यकर्त्यांशी बोलत आहोत. अडचणींचा जरी कालखंड असला तरी, आमचा विचार चांगला आहे. अत्यंत चांगल्या पद्धतीने आम्ही निवडणूक लढू,भाजपकडे धर्माचं द्वेष निर्माण करण्याचं शास्त्र आहे. निवडणूक जिंकण्यासाठी आणि सत्तेसाठी भाजप काहीही करू शकतो, अशी टिका माजी आमदार बाळासाहेब थोरात यांनी माध्यमांशी बोलताना भाजपवर केली. यावेळी ते म्हणाले की, माझी बाजू लोकांमध्ये मांडली आहे. वारकरी संप्रदाय भेद करत नाही. राजकारण त्या व्यासपीठावर नसतं. ज्यांना महाराज म्हणले जाते ते भाजपाने घुसवले आहे. ते राजकारण सुरू करत आहेत.एकनाथ शिंदे त्यांच्या पक्षासाठी आले.त्यांना बोलणं गरजेचं होतं.मी ५० वर्ष ८ वेळ निवडून आलो. मी विधानसभेत असताना सिनियर होतो. मला थांबवं लागल्याने एकनाथ शिंदे यांना आनंद होत आहे. त्यांनी त्यांच्या पक्षाची भूमिका मांडली आहे. असे मतही माजी आमदार बाळासाहेब थोरात यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

## स्थानिक स्वराज संस्था युतीबाबत स्थानिक पातळीवर निर्णय होईल

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची पत्रकार परिषदेत माहिती



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी:**येणाऱ्या निवडणुका कशा लढवाव्यात याबाबत चर्चा झाली. एकत्र, एकटे कसे लढावे, याबाबत भावना समजून घेतल्या. ज्यांना जायचे आहे. त्यांनी खुशाल पक्ष सोडून जावे, आमचा पक्ष कार्यकर्त्यांच्या जीवावर मजबूत आहे. स्थानिक स्वराज संस्था युती राज्यपातळीवर होणार नाही, स्थानिक पातळीवर निर्णय होईल.अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी ते म्हणाले की, लाडकी बहीण योजनेचा लाभ पुरुषांना मिळतोय, महिलांना फसवले आहे. नाचता येईना अंगण वाकडे असं दिसतंय. बोगस अर्ज मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून दिलेली रक्कम वसूल करावी, आघाडी युती करताना काही किंमत मोजावी लागते,लोकशाही खाणारा भाजप राक्षस आहे. त्याला नमवताना काही किंमत आम्हाला मोजवीच लागेल. मनोज जरांगे पाटील या बाबत आमची स्पष्ट भूमिका आहे आरक्षण मिळावे. मात्र, जातीनिहाय जनगणना व्हायला हवी.ही आमची मागणी आहे. तेलंगणात आम्ही केलं आहे, मराठा आरक्षणासाठी आमची हीच भूमिका आहे. जातीनिहाय जनगणनेच्या अनुषंगाने आरक्षण मिळावे, असे मतही यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

## सेंच्युरी मिलची जागा गिरणी कामगारांच्या घरांसाठी मिळण्याचा मार्ग मोकळा

**मुंबई/प्रतिनिधी :** वरळी येथील सेंच्युरी मिल मधील ४८८८.७८ चौ.मी.जागा गिरणी कामगारांच्या घरासाठी सीमांकन करून सुद्धा, वाडिया आणि सेंच्युरी मिल व्यवस्थापन यांच्या वादामुळे सेंच्युरी कामगारांच्या घरासाठी मिळत नव्हती. हा वाद मिटल्यामुळे, या जागेची मागणी केल्याने नुकत्याच मॉनेटरी कमिटीत झालेल्या सुनावणीमध्ये ही जागा घरासाठी सेंच्युरी मिल व्यवस्थापनाने देण्याची तयारी दर्शवली आहे.

गिरणी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रवीण घाग हे गेले १२ वर्ष ही जागा गिरणी कामगारांच्या घरासाठी मिळावी म्हणून मॉनेटरी कमिटीकडे दाद मागत आहेत. नुकताच नसली वाडिया आणि सेंच्युरी मिल व्यवस्थापनाचा या जागेसंबंधी असलेला वाद मिटला आहे. हे समजताच प्रवीण घाग आणि सेंच्युरी एकता मंचचे अध्यक्ष नंदू पारकर व जितेंद्र राणे यांनी यासंबंधी या सुनवणीवेळी हा प्रश्न उपस्थित केला आणि ही जागा मिळावी म्हणून जोरदार मागणी केली.

## वराह विष्णूचे तिसरे अवतार असल्यामुळे आम्ही वराह जयंती साजरी करतो : मंत्री नितेश राणे

दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** वराह जयंती आज मोठ्या उत्सहाने साजरा होतं आहे. हिंदू धर्मामध्ये वराहला तिसरा विष्णूचा अवतार म्हणून आम्ही मानतो. म्हणूनच आमच्या सनातन धर्मामध्ये वराह जयंतीला एक वेगळाच महत्व आहे. त्यामुळे सर्व हिंदू एकत्र येऊन ही जयंती साजरी करतात.अशी माहिती मंत्री नितेश राणे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, मी मंत्री म्हणून आलो नाही हिंदू म्हणून आलो आहे. हे हिंदुत्ववादी विचाराचे कार्यक्रम आहे. मी हिंदू म्हणून इकडे आलेलो आहे. त्यांच्या ईद आणि



मोहरममध्ये आम्ही हस्तक्षेप करत नाही. आम्ही वराह जयंती साजरी करत असू तर कोणाला मिरची लागण्याची गरज नाही. मिरची लागत असेल तर, पाकिस्तानची वनवे तिकीट काढून देतो.माझं म्हणणं आहे की, अमोल मिटकरी यांनी आपल्या संग्राम जगताप यांना बोलावं, त्यांच्याकडून सल्ला घ्यावा. काही तास त्याचाबरोबर बसावं. प्रबोधन संग्राम भाऊ जगताप हे त्यांचेच आमदार आहेत. नंतर नितेश राणे उत्तर देतील. अमोल मिटकरी यांनी त्यांच्या आमदार संग्राम जगताप यांना विचारावं वराह जयंतीचे महत्व काय ते? मनोज जरांगे मुंबईला येणार आहेत. त्याबाबत शासनाने एक उपसमिती जाहीर केली आहे. त्याचे प्रमुख विखे पाटलांना दिलेला आहे. पण विखे पाटील अधिकृत भाष्य करतील.अशी माहिती मंत्री नितेश राणे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

# भाविकांना चिंतामुक्त करणाऱ्या कळंबच्या चिंतामणी दर्शनासाठी भाविकांची मंदियाळी

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील कळंब येथे एक प्रसिद्ध चिंतामणी मंदिर आहे. विदर्भातील अष्टविनायकांपैकी एक मानला जातो. या मंदिरात गणपतीची मूर्ती जमिनीच्या खाली सुमारे ३५ फ ूट खोल आहे आणि मंदिराच्या आत एक गणेशकुंड आहे. यातून दर १२ वर्षांनी गंगा अवतरते. इंद्रदेवाने चिंतामणीची स्थापना केल्याची अख्यायिका आहे. २७





ऑगस्टरोजी घरोघरी श्रीगणरायाचे आगमन होणार असून, नऊ दिवस आराधना केली जाणार आहे. कळंब येथे आतापासून भाविकांची चिंतामणीच्या दर्शनासाठी मंदियाळी होत आहे.

कळंबचे चिंतामणी मंदिर यवतमाळ शहरापासून सुमारे २३ किलोमीटर अंतरावर यवतमाळ-नागपूर राज्य महामार्गावर आहे. मंदिराच्या प्रवेशद्वारातून खाली उतरल्यावर गणेशकुंड दिसतो, जो दर १२ वर्षांनी आपोआप भरतो असे मानले जाते.विदर्भातील अष्टविनायकांपैकी हे एक चिंतामणी मंदिर आहे. कळंबचा चिंतामणी भक्तांना चिंतेतून मुक्ती देतो, अशी भाविकांची अपार श्रद्धा आहे. त्यामुळे दर्शनासाठी राज्यासह अन्य ठिकाणाहून भाविकभक्त मोठ्या संख्येने येतात. हे एक हेमांडपंथी स्वरूपाचे मंदिर असून, ते एका पुरातन सरोवरात स्थापन करण्यात आले होते असे म्हटले जाते.

# अखेर त्या नादुरुस्त रस्त्याची दुरुस्ती

## ➤ डोणगाव ते शेलगाव रस्त्याच्या खचलेला कडा भरल्या
## ➤ 'आपला विदर्भ'च्या बातमीनंतर प्रशासन खडबडून जागे



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव ते शेलगाव दरम्यान असलेल्या बंधाऱ्याजवळील मुख्य रस्त्याच्या कडा मुसळधार पावसामुळे पूर्णपणे वाहून गेल्या असून, या मार्गावर दररोज किरकोळ अपघात होत आहेत. रात्रीच्या वेळी दृष्यमानता कमी असल्याने मोठ्या अपघाताचा धोका आणखीच वाढला आहे.

याबाबत 'आपला विदर्भ' लाईव्हमध्ये "रस्त्याच्या कडा वाहून गेल्याने अपघाताची शक्यता" या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करताच आणि राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तालुकाध्यक्ष निंबा पांडव यांच्या पाठपुराव्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग अखेर खडबडून जागे होत सदर रस्ता दुरुस्त करण्यात आला आहे.

डोणगाव ते शेलगाव या मार्गावरील बंधाऱ्याजवळील रस्त्याच्या कडाचा एक भाग संपूर्ण वाहून गेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे नागरी नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

गत काही दिवसापूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे नदी नाल्यांना पूर आला होता. या रस्त्याच्या बाजुलाच बंधारा असून पुराच्या पाण्यामुळे हे बंधाऱ्या लगत असलेल्या रस्त्याच्या कडा वाहून गेले आहेत.त्यामुळे या ठिकाणी अपघात होण्याची निर्माण झाली आहे. तर, दर दिवशी किरकोळ अपघात घडत आहेत.

रात्रीच्या वेळेस रस्त्याच्या खचलेल्या कडा वाहन चालकांना दिसत नसल्यामुळे या ठिकाणी मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात होती. सदर रस्ता हा तत्काळ दुरुस्त करण्याची गरज असताना याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी मात्र दुर्लक्ष केले होते. त्यामुळे नागरिकांमध्ये तथा वाहन चालकांमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात होतार सदर रस्त्याच्या कडा संबंधित विभागाने तात्काळ भरून रस्त्याची दुरुस्ती करावी अशी मागणी होत वाहनचालकांकडून होत होती.

याबाबत दैनिक आपला विदर्भमध्ये "रस्त्याच्या कडा वाहून गेल्याने अपघाताची शक्यता" या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करताच सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने २५ ऑगस्ट रोजी त्या ठिकाणी तात्पुरती उपाययोजना राबवत रस्त्याच्या कडेला दुरुस्तीचे काम सुरू केलं आहे. सध्या तरी हा धोका काही प्रमाणात टळलेला असला, तरी पावसाळ्यातील अशा दुर्लक्षित भागांकडे वेळेवर लक्ष देणं किती आवश्यक आहे.

### रस्त्याच्या कडा वाहून गेल्याने अपघाताची शक्यता

**सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष : रस्ता काडा तत्काळ दुरुस्त करण्याची राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांची मागणी**



#### रस्त्याच्या खचलेल्या कडा तात्काळ भरून काढा अन्यथा आंदोलन : गोपाल आकडे

डोणगाव ते शेलगाव मार्गावरील वाहून गेलेल्या रस्त्याची राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी पाहणी केली व संबंधित विभागाला भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून रस्त्याच्या कडा खचून गेलेला पूर्ण भाग हा तात्काळ भरून काढण्याची मागणी केली. सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याची दुरुस्ती करण्याकडे दुर्लक्ष केल्यास राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने आंदोलन करण्यात येईल. असा इशाराही राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे पाटील यांनी दिला आहे.

**डोणगाव/प्रतिनिधी:** डोणगाव ते शेलगाव मार्गावरील बंधाऱ्या जवळील रस्ता वाहून गेल्याने या रस्त्यावर अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. रस्त्याच्या कडा वाहून गेल्याने दुचाकी धारकांचे या ठिकाणी दररोज किरकोळ अपघात होत असून रात्रीच्या वेळेस मोठा अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे. वाहनचलकांचा जीव धोक्यात आला असताना संबंधित विभागाचे याकडे मात्र दुर्लक्ष झाले आहे. वाहन धारकांची समस्या लक्षात घेता सदर रस्ता काडा तात्काळ दुरुस्त करावा अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी दिला आहे.

डोणगाव ते शेलगाव या मार्गावरील बंधाऱ्याजवळील रस्त्याच्या कडाचा एक भाग संपूर्ण वाहून गेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. गत काही दिवसापूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे नदी नाल्यांना पूर आला होता. या रस्त्याच्या बाजुलाच बंधारा असून पुराच्या पाण्यामुळे हे बंधाऱ्या लगत असलेल्या रस्त्याच्या कडा वाहून गेले आहेत. त्यामुळे या ठिकाणी अपघात होण्याची निर्माण झाली आहे तर, दर दिवशी किरकोळ अपघात घडत आहेत. रात्रीच्या वेळेस रस्त्याच्या खचलेल्या कडा वाहन चालकांना दिसत नसल्यामुळे या ठिकाणी मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सदर रस्ता हा तत्काळ दुरुस्त करण्याची गरज असताना याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी मात्र दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तथा वाहन चालकांमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. सदर रस्त्याच्या कडा संबंधित विभागाने तात्काळ भरून रस्त्याची दुरुस्ती करावी अशी मागणी होत आहे.

### संघाची जोधपूरमध्ये ५ ते ७ सप्टेंबरदरम्यान बैठक

नवी दिल्ली : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची वार्षिक अखिल भारतीय समन्वय बैठक यंदा ५ ते ७ सप्टेंबर या कालावधीत राजस्थानमधील जोधपूर येथे आयोजित केली जाणार आहे. संघ व संघाशी संबंधित वैचारिक संस्थांमध्ये समन्वय साधण्यासाठी ही बैठक दरवर्षी आयोजित केली जाते.

मागील वर्षी ही बैठक केरळमधील पालक्काड येथे झाली होती. या बैठकीत भाजप, विश्व हिंदू परिषद, भारतीय मजदूर संघ, राष्ट्र सेविका समिती, वनवासी कल्याण आश्रम, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय किसान संघ, विद्या भारती यांसह संघ प्रेरित ३२ संघटनांचे राष्ट्रीय अध्यक्ष, संघटनमंत्री व प्रमुख पदाधिकारी सहभागी होणार आहेत.

## अनुसूचित जमाती कल्याण समितीचा दौरा फक्त पैसे जमा करण्यासाठी आला – काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर

**अमरावती/प्रतिनिधी:** अनुसूचित जमाती कल्याण समिती गेल्या चार दिवसापासून अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर होती, त्यांनी मेळघाट मध्ये पाहणी करत प्रशासकीय बैठका घेतल्या यामध्ये समितीचे प्रमुख दौलत दरोडा यांच्या अध्यक्षतेखाली १० आमदार होते, मात्र या अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या दौऱ्यावर काँग्रेसच्या नेत्या माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी जोरदार टीकास्त्र करत गंभीर आरोप केलेत.



अमरावती मध्ये ही समिती फक्त पैसे जमा करण्यासाठी आली होती जे बघायचं होतं ते बघितलं नाही आणि निघून गेले. पूर्ण भ्रष्टाचारी प्रवृत्तीची मंडळी त्या ठिकाणी होती आणि त्याच अनुषंगाने ते येथे आले होते असा गंभीर आरोप त्यांनी केला,,या समित्या काय करतात किती गोंधळ घालतात हे सगळ्यांना माहिती आहे..मेळघाटातील आदिवासी शाळा किती कमकुवत झाल्या हे या समितीने बघितलं नाही अशी टीका सुद्धा काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी केली

## अमरावती शहरातील राजकमल जुना उड्डाणपूल बंद केल्या मुळे नागरिकांना करावी लागत आहे मोठी कसरत





दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी:** अमरावती शहरातील जुना राजकमल उड्डाणपूला वरून सर्व वाहनकरिता येजा करण्यासाठी काल रात्री पासुन बंदी घालण्यात आली असल्यामुळे अमरावती शहरातील भर दिवसा इर्विन चौक, मालवीय चौक, जयस्तंभ चौक, शाम चौक, राजकमल चौक, राजापेठ चौका पर्यंत वाहतूक कोंडी झाली. राजकलम जुना उड्डाणं पुल बंद केल्या मुळे आता शहरातील काही कामा साठी नागरिकांना दोन तीन किलोमीटर पर्यंत रांगे पर्यंत आता मोठी कसरत करावी लागत आहे.

सदर तक्रार धुळखातच असल्याने लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांकडून कोणत्याच प्रकारचा ठोस निर्णय न घेतल्याने या मार्गावरील पुलाच्या मध्य भागामध्ये जीव घेणे खड्डा निर्माण झाल्याने दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही सध्या पावसाळा सुरू झाला असून पूर्णा नदीला मोठ्या प्रमाणात पूर आल्याने मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहे.

त्यामुळे नागरिकांना जीव धोक्यात टाकून या मार्गाने ये-जा करावी लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष देऊन या मार्गांवरील पुला नूतनीकरण करण्यात यावी अशी मागणी नागरिक करीत आहेत.

## उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय आणि ग्रंथमित्र पुरस्कारासाठी ३0 सप्टेंबरपर्यंत अर्ज करावे

दैनिक आपला विदर्भ

### प्र. संचालक अशोक गाडेकर यांचे आवाहन

**बुलढाणा/प्रतिनिधी:** राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास, वाचकांसाठी चांगल्या सेवा व वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयामार्फत दरवर्षी "डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार" तसेच उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) यांना "डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार" देण्यात येतात. या पुरस्कारांतर्गत शहरी व ग्रामीण भागातील अ, ब, क व ड वर्गातील उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे एक लाख रुपये, ७५ हजार रुपये, ५० हजार रुपये व २५ हजार रुपये इतकी रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व ग्रंथभेट देऊन गौरविण्यात येणार आहे. याशिवाय, राज्यातील एक उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व एक उत्कृष्ट ग्रंथालय सेवक (ग्रंथमित्र) यांना प्रत्येकी ५० हजार रुपये तसेच प्रत्येक महसुली विभागातील प्रत्येकी एक कार्यकर्ता व सेवक यांना प्रत्येकी २५ हजार रुपये इतकी रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट प्रदान करण्यात येईल. सन २०२४-२५ या वर्षासाठीचे अर्ज विहित नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह तीन प्रतीत संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे दि. ३० सप्टेंबरपर्यंत पाठविण्याचे आवाहन ग्रंथालय संचालनालयाचे प्र. संचालक श्री. अशोक मा. गाडेकर यांनी केले आहे.



### विविध वृत्त...

#### सर्वज्ञ चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त बुलढाण्यात भव्य शोभायात्रा



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त बुलढाणा येथील महानुभाव गोपाल आश्रमावर भव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. अखिल भारतीय पंचकृष्ण प्रबोधन परिषद, श्रीक्षेत्र जाळीचा देव बुलढाणा, यांच्या विद्यमाने सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचा अवतार दिन महोत्सव साजरा करण्यात येत आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने राज्यस्तरीय श्रीमद् भागवत गीता ज्ञान स्पर्धा यासह दोन दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, त्याचाच एक भाग म्हणून आज बुलढाणा शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली, या शोभायात्रेमध्ये महानुभाव पंथातील भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी राधा कृष्णाच्या वेशभूषा केलेल्या तरुण आणि तरुणीने बुलढाणा शहर येथील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते.

#### निराधार योजनेच्या लाभार्थ्यांच्या आंदोलनाने दणाणले तहसिल कार्यालय



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी:** अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे शहरासह तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांचे संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना व अपंग व्यक्तींना योजनेचे गेल्या ७-८ महिन्यांपासून मासिक मानधन खात्यावर जमा न झाल्यामुळे आम आदमी पक्ष, शिवसेना (ठाकरे गट), भारतीय कम्युनिष्ट पक्ष, जनता दल (से.), मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या पक्षातर्फे २५ ऑगस्ट रोजी माजी न.प. उपाध्यक्ष नितीन गवळी यांच्या नेतृत्वात मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनामुळे लाभार्थी मोठ्या प्रमाणात तहसिल कार्यालयात एकवटले होते. यामुळे कार्यालय परिसर घोषणांनी दणाणून गेला होता. भजने गात टांगा द्वारे लाभार्थी मोठ्या प्रमाणात तहसील कार्यालयात पोहोचले होते. तहसीलदारांच्या लेखी आश्वासनानंतर सदर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

#### जिल्हा माहिती कार्यालयात भगवान श्री चक्रधर स्वामी यांना जयंतीनिमित्त अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्हा माहिती कार्यालयात सोमवारी भगवान श्री चक्रधर स्वामी यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा माहिती कार्यालयातील वरिष्ठ लिपीक जयंत वानखेडे, वरिष्ठ लिपीक प्रेमनाथ जाधव, शिपाई राम पाटील, राजू घाडगे, वाहनचालक नामदेव घट्टे, पत्रकार रविंद्र फोलाने आदी उपस्थित होते.

#### राज ठाकरेंचा एकनिष्ठ सैनिक, स्थापनेपासून सोबत, २० वर्षांनी साथ सोडणार, कोण आहेत वैभव खेडेकर?

**मुंबई/प्रतिनिधी:** मनसेचे कोकण संघटक व राज्य सरचिटणीस वैभव खेडेकर हे लवकरच राज ठाकरेंची साथ सोडून भाजपच्या गोटात दाखल होणार असल्याची जोरदार चर्चा रंगली आहे. काही दिवसांपूर्वी वैभव खेडेकर दापोलीत महायुतीच्या नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर दिसले होते. त्यावेळी महायुतीच्या नेत्यांनी वैभव खेडेकर यांना आपल्या पक्षात येण्याची जाहीर ऑफर दिली होती. यानंतर आता वैभव खेडेकर यांनी भाजपमध्ये जाण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. राज ठाकरे (ठरर ऊप्म्वीरब) यांनी शिवसेनेतून बाहेर पडून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना केल्यापासून वैभव खेडेकर त्यांच्यासोबत होते.